# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

# औरंगाबाद परिमंडल,औरंगाबाद.

## प्रकरण क्र. सीजीआरएफ/एझेड/शहर/५९३ /२०१६/२४

**(नोदंणी क्रमांक २०१६०८०२७० )**

| | |
|---|---|
| तक्रार दाखल | दिनांक :- २४.०८.२०१६ |
| निकाल | दिनांक :- ०५.१०.२०१६ |

सौ.गजरा रवि जोबनपूत्रा — तक्रारदार
प्लॉट नं. ४, गट नं.१०५, ज्ञानेश्वर नगर,
सातारा परिसर,
औरंगाबाद ४३१ ००१.
(ग्राहक क्रमांक ४९००१२६२०१८४)

## विरुध्द

कार्यकारी अभियंता (प्रशासन), — गैरअर्जदार
नोडल ऑफिसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म .
शहर मंडल, औरंगाबाद.

## मंच

| | |
|---|---|
| १ ) डॉ.भास्कर पालवे | अध्यक्ष |
| २ ) श्री. उत्तम.म.उरकुडे | सदस्य / सचिव |
| ३ ) श्री. वि. सु काबरा | सदस्य |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच -निर्णय

सौ.गजरा रवि जोबनपूत्रा, प्लॉट नं. ४, गट नं.१०५, ज्ञानेश्वर नगर, सातारा परिसर, औरंगाबाद (अर्जदार) या महावितरण यांच्या ग्राहक असून त्यांचा ग्राहक क्रमांक ४९००१२६२०१८४ असून त्यांना दिनांक ०८.१२.२०१० ला वीज पूरवठा दिला आहे. त्यांनी महावितरण (गैरअर्जदार) यांचे विरुध्द महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल) विनियम २००६ च्या अनुसूची -अ नमुन्यात दिनांक २४-०८-२०१६ रोजी तक्रार दाखल केली आहे . तक्रारीचा थोडक्यात तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१) ग्राहकास सुरुवातीपासून (दिनांक ०८.१२.२०१०) LT VII TSO या सदरा खाली चुकीचे बील देण्यात आले. वस्तुतः सिंगल फेज बांधकाम या वापरासाठी वीज जोडणीची मागणी ग्राहकाने केली होती.

२) दिनांक ११.०९.२०११ रोजी बांधकाम पुर्ण झाले. त्यानंतर वीज बील घरगुती सदराखाली आकारणी करणे आवश्यक होते. त्यामुळे स्थीर आकार व ऊर्जा आकार त्यावेळेच्या वीज दरानुसार दुरुस्त करणे आवश्यक आहे. सदर आकारणी घरगुती विजेचा वापर या सदराखाली करावी. जास्त वसुल केलेली रक्कम व्याजासह ग्राहकास परत करावी. ग्राहकाकडुन केलेल्या सुरक्षा अनामत रुपये १०,०००/- यातील रुपये ९,०००/- परत करावेत. घरगुती वीज वापरासाठी ठरविण्यात आलेली सुरक्षा अनामत रु. १,०००/- गैरअर्जदाराने ठेवुन घेण्यात यावी.

३) आयजीआरसी च्या दिनांक ०४.०८.२०१६ रोजीच्या आदेशात दुरुस्ती करावी. कारण ग्राहकाचा वीज पूरवठा तात्पुरता खंडीत करण्यात आलेला नाही.

४) ग्राहकाची कोणतीही चुक नसल्याने विलंब आकार रद्द करण्यात यावा. ग्राहकाने वेळोवेळी वीजबील अदा केले आहे हे सीपीएल वरुन दिसून येते. स्थळ तपासणी करण्यासाठी रु. २,०००/- अनामत म्हणुन ग्राहकाकडुन जबरदस्तीने दि २८.०४.२०१६ ला वसुल करण्यात आले.

करीता अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाचा आदेश रद्द करुन वीज बिलाची वर्गवारी घरगुतीप्रमाणे आकारुन बील दुरुस्ती करावी.मागील बील तात्पुरते बांधकाम या सदराखाली व्यावसायिक दराने आकारण्यात यावे व झालेल्या त्रासापोटी रुपये ५०००/- नुकसान भरपाईची मागणी केलेली आहे.

**गैरअर्जदार, कार्यकारी अभियंता, महावितरण, शहर विभाग-१, औरंगाबाद यांचे म्हणणे.**

१) ग्राहकास दिनांक ०८.१२.२०१० मध्ये तात्पुरत्या दराने वीज पूरवठा देण्यात आलेला आहे. ग्राहकाने एप्रिल २०१६ मध्ये वर्गवारी बदलाच्या संदर्भातला अर्ज छावणी उपविभागीय कार्यालयात सादर केला होता. सदर तक्रारीस अनुसरुन जागेची स्थळ तपासणी करुन त्यानुसार ग्राहकास मे महिन्याच्या वीज बिलामध्ये वर्गवारी घरगुती दराने करुन देण्यात आलेली आहे.

२) ग्राहकाने वर्गवारी घरगुती दराने मे २०११ पासून करण्यासंबंधी M/s. GTL कडे केलेल्या अर्जाच्या पोच वर M/s. GTL चा शिक्का आहे परंतु सही नाही.

३) तसेच सदरील ग्राहकाने वर्गवारी घरगुती दराने करुन देण्यात यावी. फरकाची रक्कम व त्यावरील व्याज माफ करावे अशी तक्रार IGRC कडे केली आहे. सदर मागणी IGRC ने खारीज केली आहे.

सदर मागणी खारीज करावी व ग्राहकास थकबाकी भरण्यास मा. ग्राहक गा-हाणे मंचाने आदेश द्यावेत व सदर प्रकरण निकाली काढावे अशी विनंती गैरअर्जदार यांनी केली आहे.

**ग्राहक गा-हाणे निवारण मंचाचे निष्कर्ष**

१) अर्जदार यांनी घराचे बांधकामासाठी तात्पुरता वीज पूरवठा घेणेसाठी अर्ज केला असल्याने त्यांना त्याप्रमाणे गैरअर्जदारानी दिनांक ०८.१२.२०१० ला वीज पूरवठा दिला आहे.

२) MERC Tariff Order प्रमाणे बांधकामासाठी घेतलेला तात्पुरता वीज पुरवठा हा व्यावसायिक दराने (Commercial Tariff –LT II) बिलींग करणे क्रमप्राप्त असतांना सुध्दा गैरअर्जदाराने सदरचे वीज कनेक्शनला LT VII - TSO तात्पुरता वीज पूरवठा (इतर) या दराने सुरुवातीपासून चुकीचे बिलींग केलेले आहे.

३) अर्जदाराने बांधकाम पुर्ण झाल्यानंतर सदरचे वीज कनेक्शनचा दर घरगुती दराने आकारण्याबाबत दिनांक ११.०९.२०११ ला तत्कालीन GTL कंपनीकडे अर्ज केला. त्याची पोहोच पावती सादर केली आहे. सदरचे अर्जात त्यांनी तात्पुरता वीज पूरवठा (इतर) दराऐवजी व्यावसायिक दर आकारण्यात यावा व तफावत रकमेचे समायोजन करण्यात यावे. व बांधकाम पुर्ण झालेले आहे या बद्दल उल्लेख केलेला नाही.

४) वरील अर्जाप्रमाणे वीज दराची सुधारणा न केल्याने अर्जदाराने पुन्हा दिनांक २८.०४.२०१६ ला अर्ज करुन घरगुती दराने वीज बिलाची आकारणी करण्यात यावी असा अर्ज गैरअर्जदारास सादर केल्याने गैरअर्जदार यांनी दिनांक २८.०४.२०१६ ला तपासणी करुन माहे मे २०१६ पासून वीजेचा दर घरगुती दराप्रमाणे आकारणी केली आहे. या अर्जात सुध्दा तात्पुरता वीज पूरवठा (इतर) या दराऐवजी व्यावसायिक दराने आकारणी करण्यात यावी व तफावत रकमेचे सामायोजन करण्यात यावे या बाबत उल्लेख केलेला नाही.

५) अर्जदाराने दिनांक १६.०७.२०१६ चे मंडल कार्यालयांतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे केलेल्या तक्रारीमध्ये स्थिर आकार वर्ष २०१३ पासून रुपये ३६०/- वरुन रुपये ५०/- होणे बाबत व त्यावरील व्याज माफ होणे बाबत नमुद केले आहे व ते IGRC ने अमान्य केले आहे.

६) अर्जदाराने IGRC चे आदेशावर या मंचास दिनांक २४.०८.२०१६ ला अपील दाखल केले. त्यात सुध्दा दिनांक ११.०९.२०११ पासून स्थिर आकार ५०/- होणे तसेच व्याजाची संपुर्ण रक्कम कमी होणे बाबत नमुद केले आहे व या मंचाचे सुनावणी दरम्यान पुरवणी तक्रार अर्ज दिनांक ०५.१०.२०१६ मध्ये दिनांक ०८.१२.२०१० पासून तात्पुरता वीज पूरवठा (इतर) LT VII - TSO ऐवजी बांधकामासाठी व्यावसायिक लावण्यात यावा व जास्तीची भरणा केलेली रक्कम परत करण्याबाबत नमुद केले आहे.

७) अर्जदाराने दिनांक ११.०९.२०११ ते २८.०८.२०१६ चे दरम्यान सदर विषयाबाबत गैरअर्जदाराकडे कोणतीही तक्रार केलेली आढळत नाही.

८) अर्जदाराने दिनांक ३०.०६.२०१६ चे अर्जामध्ये बांधकाम हे २०१३ मध्ये पुर्ण झाल्याचे नमुद केले आहे. तसेच बांधकाम पुर्ण झाल्याचे निश्चितीकरणास कोणतेही अधिकारी किंवा प्राधिकरणाकडुन प्रमाणपत्र सादर केलेले नाही. ज्याअर्थी ग्राहकाच्या CPL ची तपासणी केली असता माहे ऑगस्ट २०१४ पर्यंत वीज वापर असल्याचे व त्यानंतर शुन्य युनिट वीज वापर असल्याचे आढळले, त्या अर्थी घराचे बांधकाम हे माहे ऑगस्ट २०१४ मध्ये पुर्ण झाले असावे.

वरील अर्जदार, गैरअर्जदार यांचे म्हणणे व ग्राहक गा-हाणे निवारण मंचा यांचे निष्कर्ष यावरुन मा. ग्राहक गा-हाणे निवारण मंच खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# **आदेश**

१) अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण मंचचा दिनांक ०४.०८.२०१६ चा आदेश रद्द करण्यात येत आहे.

२) अर्जदाराची ग्राहक वर्गवारी घरगुती वीज वापर यासाठी माहे सप्टेंबर २०१४ पासून करण्यात यावी.

३) विद्युत कायदा २००३ चे कलम ५६ (२) नुसार ग्राहकाची वर्गवारी LT VII TSO ऐवजी व्यावसायिक LT II या दराने करण्यात यावी.

४) अर्जदाराची वाजवी पेक्षा जास्त जमा अनामत रक्कम नियमानुसार अर्जदारास परत करावी.

५) सदरचे कालावधीतील वीज बील उशिरा भरणे (DPC) व त्यावरील व्याज (Interest) या दंडात्मक रकमा ग्राहकाकडुन वसुल करु नये.

६) अर्जदारास झालेल्या मानसिक त्रासापोटी रुपये १०००/- नुकसान भरपाई देण्यात यावी व ती रक्कम त्यांचे वीज बिलात समायोजित करावी.

७) आदेशाची अंमलबजावणी करुन ३० दिवसांचे आत अनुपालन करुन अहवाल सादर करावा.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरीत | स्वाक्षरीत | स्वाक्षरीत |
| डॉ.भास्कर गो.पालवे | उत्तम.म.उरकुडे | विलासचंद्र.सु.काबरा |
| अध्यक्ष | सदस्य/सचिव | सदस्य/सचिव |